ISSN 2278-3954 Saptahik Nagara

साप्ताहिक नगारा

संस्थापक संपादक : दलितमित्र स्व. गोविंदराव गोरवाडकर

R.N.I. No. 16746/67 पोष्टाचा परवाना क्र. एम.जी.एन.३९/२०१८-२०२०

श्री. _____

पत्ता _____

_____

बरील पत्त्यावर अंक न पोहोचल्यास परत पाठविण्याचा पत्ता : मा. संपादक सा. नगारा, ८५२, गोरवाडकर वाडा, मालेगांव कँम्प (नाशिक)

NAGARA WEEKLY

* मंगळवार दि. ६ ऑगस्ट २०१९



बदलतं आभाळ

॥ मुक्तक ॥
प्रा.सुरेश भिलकोटकर
मो. : ९४२१६०९४३७
(लेखक मुक्त विद्यापीठात प्राध्यापक आहेत.)

त्या दिवशी मलाही घरी परतायला उशीर झाला होता. संध्याकाळची दिवे लागण्याची वेळ होती. माझ्या राजदूत मोटारसायकलच्या मिणमिणत्या हेडलाईटच्या साहाय्याने मी नाशिकहून सायखेड्याकडे घरी निघालो होतो. चितेगाव फाट्यावर पोहोचलो. तोच पाच-सात जणांचा घोळका माझ्या राजदूतला आडवा झाला. माझी ते वाटच पहात असावेत. सगळेच चेहरे पाहून काही तरी गंभीर घडल्याचे मला जाणवले.



मी गाडी बाजूला नेत विचारले, ''काय रे? काय झालं?''

''संतोषच्या मुलाला थळमालकाच्या ट्रॅक्टरने उडविले,'' दीपक म्हणाला.

''कसं काय..?'' मी.

थळमध्ये आम्ही तोड करत होतो. पोरंपोरं बांधाजवळ होते. थळमालक ट्रॅक्टर रिव्हर्स घेत होता. त्याने मागे पाहिले नाही. पोरगी मागच्या चाकाखाली दाबून गेली. काहीच शिल्लक ठेवलं नाही. पोरगी जागेवरच गेली..आवाजही निघाला नाही. बाकीच्या पोरांनी आरडाओरड केल्यावर आम्ही गेलो. तर एण्ड झाला होता.'' साहेबरावने घाबरतच सांगितले.

''हे सारे केव्हा घडले..?'' मी

''सकाळी न्याहारीच्या वेळी''

''मग मुलीचे पुढे काय केले..?'' मी

''काय करणार..पोलीस सारखे चकरा मारु ऱ्हायले. दम देताहेत..दोष आमचाच आहे म्हणून सांगताहेत! कसे मिटवायचे म्हणून विचारताहेत. नाहीतर एकेकाला अंदर करीन म्हणताहेत. आम्ही दुपारपासून तुमचीच वाट पाहतोय आबा.. काही तरी करा... यातून आम्हाला वाचवा नाहीतर पोलीस आम्हाला सोडणार नाहीत..''

एकंदरीत सर्वच जण भेदरलेले होते. संतोषला पोटची पोरगी मेल्याचे दुःख होतंच...त्याहीपेक्षा पोलीस आता असं सोडणार नाहीत म्हणून तो भेदरला होता. मला पाहिल्यावरच त्या सर्वांनाच धीर आला. चितेगाव फाटा हा औरंगाबाद हायवेवरील एक थांबा...त्यापासून जवळच असलेल्या लालपाडी शिवारात ही घटना घडली होती.

मी संतोष आणि एकाला माझ्या मोटारसायकलवर घेऊन चांदोरीचे प्राथमिक आरोग्य केंद्र गाठले. तेथे मुलीचे पोस्टमार्टम झाले होते. त्यावेळचे तेथील आरोग्य अधिकारी माझे परिचित होते. दैनिक सकाळचा प्रतिनिधी म्हणून ते मला ओळखत होते.

संतोष हा उसतोडणी कामगार. त्याला चार मुली होत्या. सर्वात मोठी मुलगी दहा वर्षाची तर लहान मुलगी अडीच वर्षाची. ती आज सकाळी ट्रॅक्टरच्या चाकाखाली सापडली होती. या चवथ्या मुलीला जन्म देऊन संतोषची बायको दोन वर्षापूर्वी देवाघरी गेली होती. दिवसरात्र काबाडकष्ट..निकस आहार...नि अस्वच्छता यांमध्ये तिचे जगणं तसं अवघडच होतं...चारही मुली आणि म्हाताऱ्या आईला घेऊन संतोष ऊसतोडणीसाठी दरवर्षी निफाड कारखान्यावर येत असे...यावर्षीही आला होता.

सकाळी शक्य होईल तितक्या लवकर उठून ऊसाच्या शेतात जाऊन तोड करणं, मालट्रक येईल तेव्हा ती लोड करणं...हा त्यांचा इतरांबरोबरचा दिनक्रम होता. दिवसभर शेतात ऊसतोडीसाठी राहावे लागत असल्याने मुलीला झोपडीत ठेवण्यापेक्षा तो बैलगाडीत घालून शेतात नेत असे.. तशी सर्वांचीच मुले असत.. त्यातील जाणती मुले कामात मदत करीत. मोळ्या वाहात...त्यापेक्षा लहान मुले बारक्यांना सांभाळत.

त्यादिवशीही संतोषची मोठी मुलगी त्याला शेतात मदत करीत होती. इतर तिन्ही बांधालगत खेळत होत्या... अडीच वर्षाची लहान पोर इतकी बारकी होती की झुडपाच्या बाजूला ट्रॅक्टरच्या चालकाला ती दिसलीच नाही! ट्रॅक्टर मागे घेतला आणि ती मागच्या मोठ्या चाकाखाली आली. तिचा आवाजही निघाला नाही. ट्रॅक्टरवाला निघून गेला...इतर मुलांच्या लक्षात आले...त्यांनी मोठ्यांनी आरडाओरडा केला..तोपर्यंत ट्रॅक्टर पसार झाला होता. कामकऱ्यांनी शेतमालकाला बोलावले. तेव्हा, ''तुम्हीच कोणीतरी मारले नि माझ्या शेतात टाकले..थांबा तुम्हा दाखवतोच.!'' म्हणून तो निघून गेला! थोड्या वेळाने आला तो पोलीसांसह..पोलीसांनी संतोष नि टोळीतल्या इतरांना दमदाटी सुरु केली. ऊसतोड सर्व अडाणी..काय करावे हे त्यांना कळेना... सारेच भेदरले. गर्भगळीत झाले.. थोडेफार पैसे जमवून हे लफडं मिटवावं...म्हणून विचार करीत फाट्यावर माझी वाट पहात थांबले!

मी दोघांना बाहेर थांबवून प्राथमिक आरोग्य केंद्रात गेलो. मी सरळ आत डॉक्टरांकडे जातांना मला पोलिसांनी पाहिले. त्यांच्यासोबत ट्रॅक्टरमालकही होते. मी डॉक्टरांशी चर्चा केली. ॲक्सिडेंट केस होती हे स्वच्छ होते. परंतु

(बदलतं आभाळ पान १५ वर)

(बदलतं आभाळ पान १४ वरून)

ट्रॅक्टरवाले प्रतिष्ठित असल्याने डॉक्टरही संदिग्ध झाले होते...त्याचा गैरफायदा शेतमालक व पोलीस घेऊ पाहात होते.

शेतमालकाला नसती तोहमत नको होती तर पोलीसांनी दिवसाची कमाई सुटण्यात आनंद होता. म्हणून ज्याची मुलगी गेली त्यालाच दमदाटी करुन दिवसभर त्यांनी शिरजोरी केली होती.!

माझे सरळ डॉक्टरांकडे जाणे...आत आमचे दोघांचेच बोलणे होणे...यामुळे पोलीस व शेतमालकांचा नूर पालटला होता. तर संतोष व मंडळीच्या जीवात जीव आला होता. मी डॉक्टरांकडून बाहेर येत असतांनाच पोलीसांनी संतोषला बोलावले..त्याला थांबवून मीच पोलीसांकडे गेलो नि विचारले, ''साहेब घटना सकाळी घडलीय...आपण तिची नोंद काय केली ती सांगाल काय..? परिस्थितीचा बदललेला नूर त्यांच्या लक्षात आला.

त्यांच्यातील एका पोलीसाने मला बाजूला नेले. ''सर जाऊ द्याना.. घटना घडून गेली..कोणी मुद्दाम करीत नाही...गेलेला जीव परत येत नाही...मिटवून टाका...'' मी त्यांच्याकडे पाहातच राहिलो! माझ्यापुढे संतोषचा भेदरलेलला आणि काम सोडून दिवसभर पोलीसांच्या पाया पडणाऱ्या लोकांचे चेहरे हटत नव्हते. मी पुढे काही बोलण्याच्या आत त्यांनी ट्रॅक्टरमालकाला बोलावले..माझ्याकडे पहात म्हणाले, ''हे पाहा मुलीच्या बापाला दोन हजार रुपये देऊन टाका...मिटवून टाका...आणि सर तुम्हीही तुमच्या माणसांना समजावून सांगा..''

ही चर्चा चालू असतांना...संतोष आणि ऊसतोडी मंडळी आमच्या अवती भवती जमा झालेली होती. काही क्षणातच परिस्थिती बदलून गेली होती. संतोष आणि मंडळीत आता उत्साह आला होता...भीतीची जागा आता विश्वासाने घेतली होती. त्यांच्यातली कुजबूज वाढू लागली. एकजण संतोषला मागे ओढत मोठ्या धाडसाने पुढे आला, ''अजिबात मिटवणार नाही! आमची मुलगी मारुन टाकली. तिचा जीव काय नुसता दोन हजार रुपयांचा होता काय..? संतोष एवढे कमी पैसे घ्यायचे नाहीत.'' त्याने निक्षून सांगितले. इतरांनी त्याची री ओढली. इतका वेळ घाबरुन बसलेले...कोणताही आत्मविश्वास नसलेले...सर्वच जण आता अधिक पैसे मागत होते...मुलगी जाण्याचे दुःख आता बोथट झाले होते...पोलीसांच्या दमदाटीतून निर्माण झालेली भीतीही आता पार दूरवर पळाली होती. आता पैसे दिसत होते. पैशाने दुःखावर, आपलेपणावरही मात केली होती. आता संतोषसह साऱ्यांचं आभाळ बदललं होतं. सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी आभाळाचे रंग बदलत असतात.. संतोषच्याही आभाळात सकाळी मुलीच्या वियोगाचं..मृत्यूचं दुःख होतं. दुपारी पोलीसांच्या दमदाटीतून निर्माण झालेली भीती होती तर संध्याकाळच्या आभाळात पैशांची आस दिसत होती. संतोषच्या झटपट बदलणाऱ्या आभाळामागे दारिद्र्य, अडाणीपणा असावा ही मनुष्यप्रवृत्ती, हे कोडं मला अनेक वर्षांनंतरही उकललं नाही!!

■■■

(प्रसन्न मन – राग यमन पान ९ वरून)

मागेपुढे पाहत नाहीत. याला कारण हा संपूर्ण वर्गीय राग असल्यामुळे यात विस्तार करायला स्वरवैपुल्य आहे, हेदेखील असावे. त्यामुळे तो गायला 'सोपा' वाटत असावा. (खरे तर कुठलाही राग उत्तम प्रकारे पेश करणे 'वाटते' तेवढे सोपे नाहीच मुळी!) तर अशीच एका हौशी मैफिलीची 'परदेशी' आठवण सांगितल्याशिवाय राहवत नाही. गतवर्षी मी माझ्या लेकीकडे इंग्लंडमधील 'कार्डिफ' येथे गणेशोत्सवाच्या काळात पाहुणी म्हणून गेले होते. तेथील महाराष्ट्र मंडळातर्फे तेथील रहिवाशांनी गणेशोत्सवानिमित्त एक गाण्याचा कार्यक्रम करायचे ठरवले. एकेकाने एखाद्या रागाची शास्त्रीय बंदिश व त्यानंतर लगेच त्याच रागावर आधारित सुगम गीत सादर करायचे असे कार्यक्रमाचे स्वरुप ठरले. माझ्या लेक, जावयाचा त्यात महत्त्वाचा सहभाग होता. तिथे त्यांना संवादिनी वादनासाठी (साथीदार म्हणून!) कोणीही उपलब्ध होण्यासारखे नव्हते. मग आली की ती जबाबदारी माझ्या गळ्यात! (म्हणजे हातात) खरे तर बऱ्यापैकी स्वरज्ञान असले तरी मी आयुष्यात कधीही हार्मोनियम वाजवली नव्हती वा साथही केली नव्हती कोणाला! पण ठरवले की काही अशक्य नसते. अजून महिना आहे, होईल सराव म्हणत मीही सगळ्यांबरोबर सराव करु लागले. कन्या अमृता हिने 'यमन'ची 'सखी येरी अलि पियाबिन' ही पारंपरिक बंदिश व नंतर 'रंजिश ही सही' ही गजल सादर केली. नंतर एका गुणवतीने 'निगाहे मिलाने को'चा रंग जमवला आणि सगळेजण यमनरंगी रंगलो.

असा हा अत्र-तत्र-सर्वत्र भरुन उरलेला राग 'यमन कल्याण' माझ्यापुरते सांगायचे झाले तर यमनने मला काय नाही दिले?

माझ्या जीवनातल्या आनंदाच्या क्षणी मला कधी न कधी 'जीवनात ही घडी अशीच राहू दे' चे शब्दसूर आठवलेच.

माझी (कदाचित हे वाचणाऱ्या तुमचीही) तरुणाई 'जिथे सागरा धरणी मिळते' म्हणत अनाम अशा कुणाची तरी वाट पाहत राहिली....

'जिवलगा कधी रे येशील तू' म्हणत सुखस्वप्नांवर तरंगत राहिली!

'शुक्रतारा मंद वारा'चा यमन अजूनही मनात चांदणे विरघळवतो व मन मोहरुन उठते....

'सुखकर्ता दुःखहर्ता'सारखी आरती केवळ आबालवृद्धांनाच आपल्या भक्तिभावाचा आविष्कार वाटली असेल असे नाही तर साक्षात श्रीगणेशाच्या कानालाही सुखावत असणार.....

'तिन्हीसांजा सखे मिळाल्या' किंवा 'या कातरवेळी पाहिजेस तू जवळी'च्या यमनने आमच्या कितीतरी सांजवेळा एक अबोधशी हुरहुर मनाला लावून गेल्या असतील.....

गानसरस्वतींचा 'मोंमन लगन लागी' आळवणारा यमन.... त्याने आपल्याला शास्त्रीय संगीताच्या संपन्नतेची खोली...उंचीची जाणीव देऊन श्रीमंत केले.

आजही 'भय इथले संपत नाही' असे 'प्रेस'च्या शब्दांत आळवणारा यमन पोरकेपणाची जाणीव देत आर्तावत राहतो. यमनने मला.... आपल्याला अनंत हस्तांनी (गीतांनी) भरभरुन दिलंय..... देत राहील! म्हणूनच म्हणावेसे वाटते.

यमन मनरंग तरंग दावी
ध्याता गाता श्रवणसुखाची..
कळ जीवाला लावी

■■■